# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // घनकचरा व्यवस्थापन //

## // गोषवारा //

सभा दि. २१।९।२०२२

**प्रकरण क्रमांक ( २१ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio - Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणेकरीता येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रकिया करणे, प्रक्रियेअंती शिल्लक राहणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे याकरीता शासनाने नेमलेले ICUC कंन्संल्टंट प्रा. लि. यांची नेमणुक करण्यात आली होती.

सदर बाबत ICUC कंन्संल्टंट प्रा. लि. यांनी उपरोक्त कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) बनविण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास मा. महासभा ठराव क्र. (१४) दि.०२/०५/२०१८ रोजी अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली होती.

सदर प्रकल्प अहवालामधील जुन्या शिल्लक असलेल्या घनकचऱ्याची बायोमायनिंग करणे कामी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी फक्त २.०० लाख घन मिटर मोजमापास तांत्रिक मंजुरी दिली होती. त्याअनुशंगाने महानगरपालिकेने प्रथम टप्प्यात बायोमायनिंग पध्दतीने उत्तन येथे जमा असलेल्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांना अंतिम मंजुरी मिळुन मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना २.०० लाख घन मिटर उपरोक्त कामाचा कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. बायोमानिंगचे काम सुरु आहे.

सद्यस्थितीत उर्वरीत जमा असलेल्या घनकचऱ्याचे (Legacy Waste) सर्वेक्षण करुन मोजमाप घेण्यात आलेले आहे. सदर मोजमाप कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे यांच्याकडुन प्रमाणित करण्यात आलेले आहे. सदर कचऱ्याचे अंदाजे ९,०९,६३०.२ MT वजन होत आहे.

शासन निर्णय क्रमांक:- स्वमअ-२०२२/प्र.क्र.९३/नवि-३४ दि.१० ऑगस्ट, २०२२अन्वये ९,०९,६३०.२ MT घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio-Mining Legacy Waste Remediation) करण्यास प्रशासनाने मान्यता दिली असुन सदर कामी ४०.६६ कोटी रकमेस प्रशासकिय मान्यता शासनाव्दारे प्राप्त झाली आहे. सदर कामाचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| घनकचऱ्याचे मोजमाप (MT) | प्रकल्पाची एकुण रक्कम (कोटी) | केंद्रशासनाचा हिस्सा (कोटी) | राज्यशासनाचा हिस्सा (कोटी) | महानगरपालिकेचा हिस्सा (कोटी) |
|---|---|---|---|---|
| ९०९६३०.२ | ४०.६६ | १३.४२ | १५.०४ | १२.२० |

वरीलप्रमाणे होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व उपरोक्त कामाची निविदा मागविण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

13.9.22

(रवि पवार)
**उप-आयुक्त (घप्रवि)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

# मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

**प्रशासकिय ठराव दिनांक** २९ / ०९ /**२०२२ रोजी** (दुपारी) १.३० **वाजता**

**विषय क्रमांक - (२९ )** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio - Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी येणाऱ्या घनकचऱ्यावर प्रकिया करणे, प्रक्रियेअंती शिल्लक राहणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे याकरीता शासनाने नेमलेले ICUC कंन्सल्टंट प्रा. लि. यांची नेमणुक करण्यात आली होती.

सदर बाबत ICUC कंन्सल्टंट प्रा. लि. यांनी उपरोक्त कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (Detail Project Report) बनविण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास मा. महासभा ठराव क्र. (१४) दि.०२/०५/२०१८ रोजी अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली होती.

सदर प्रकल्प अहवालामधील जुन्या शिल्लक असलेल्या घनकचऱ्याची बायोमायनिंग करणे कामी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी फक्त २.०० लाख घन मिटर मोजमापास तांत्रिक मंजुरी दिली होती. त्याअनुशंगाने महानगरपालिकेने प्रथम टप्प्यात बायोमायनिंग पध्दतीने उत्तन येथे जमा असलेल्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांना अंतिम मंजुरी मिळुन मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना २.०० लाख घन मिटर उपरोक्त कामाचा कार्यादेश देण्यात आला होता.

सद्यस्थितीत उर्वरीत जमा असलेल्या घनकचऱ्याचे (Legacy Waste) सर्वेक्षण करुन मोजमाप घेण्यात आलेले आहे. सदर मोजमाप कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे यांच्याकडुन प्रमाणित करण्यात आलेले आहे. सदर कचऱ्याचे मोजमाप ७,५६,१२५.४८ घन मिटर असुन ९,०९,६३०.२ MT वजन अंदाजे होत आहे.

शासन निर्णय क्रमांक:- स्वमअ-२०२२/प्र.क्र.९३/नवि-३४ दि.१० ऑगस्ट, २०२२ अन्वये ९,०९,६३०.२ MT आकारमान आले असुन घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio-Mining Legacy Waste Remediation) करण्यास मान्यता दिली असुन सदर कामी ४०.६६ कोटी रकमेस प्रशासकिय मान्यता शासनाव्दारे प्राप्त झाली आहे. सदर कामाचा वित्तिय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

| घनकचऱ्याचे मोजमाप (MT) | प्रकल्पाची एकुण रक्कम (कोटीमध्ये) | केंद्रशासनाचा हिस्सा (कोटीमध्ये) | राज्यशासनाचा हिस्सा (कोटीमध्ये) | महानगरपालिकेचा हिस्सा (कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|
| ९०९६३०.२ | ४०.६६ | १३.४२ | १५.०४ | १२.२० |

तरी वरीलप्रमाणे होणाऱ्या खर्चास व कामाची निविदा मागविण्यासाठी प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** २० **दिनांक** २९/०९/२०२२

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio - Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी शिल्लक असलेल्या घनकचऱ्यावर (Legacy Waste) (Bio - Mining) पध्दतीने विल्हेवाट लावणे त्याचप्रमाणे सदर काम करुन घेण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे याकामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त Bio-Mining करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे कामाच्या निविदा प्रकिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**// घनकचरा व्यवस्थापन //**

// गोषवारा //

सभा दि०२९/०८/२०२२

**प्रकरण क्रमांक ( २२ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन निघणाऱ्या इर्नटची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाठ लावणेकरीता सॅनिटरी लँडफिल्ड तयार करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व निविदा मागविण्यास मान्यता मिळणेबाबत..

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे ४५० टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते. सदर कचऱ्यावर प्रक्रिया केल्यानंतर निघणाऱ्या इर्नटची "Sanitary Landfill" करुन विल्हेवाट लावणे कामी संदर्भिय पत्र क्र.०१ अन्वये तांत्रिक सल्लागार म्हणुन मे. जयंत घिके यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

मे. जयंत घिके यांनी Sanitary Landfill तयार करण्यासाठी सादर केलेल्या नकाशे व डिझाईन "राष्टीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थान" (NEERI) यांच्याकडुन तपासणी करणे करीता जा.क्र.मनप.घप्रवि/९३/२०२२-२३ दि.०६/०७/२०२२ अन्वये पत्रव्यवहार करण्यात आला होता.

मे. जयंत घिके यांनी "Sanitary Landfill" तयार करण्यासाठी रु.१०,८५,९७,००६/- रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेल आहे. दि.०५/०९/२०२२ रोजी मे. राष्टीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थान (NEERI) यांनी तांत्रिक सल्लागार मे. जयंत घिके यांनी सादर केलेले नकाशे व डिझाईन यांना प्राथमिक मंजुरी दिलेली आहे.

सन २०२२-२३ या आथिक वर्षात "इर्नट उचलणे/ कचरा सपाटीकरण/ लँण्ड फिल्ड" या लेखाशिर्षकाअंतर्गत रु.४००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सदर कामी रु.१०,८५,९७,००६/- इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता व उपरोक्त कामाची निविदा मागविण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

१३.९.२२

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (घप्रवि)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

# मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

**प्रशासकिय ठराव दिनांक २१ / ०९ /२०२२ रोजी दुपारी १.३० वाजता**

**विषय क्रमांक** - (२२) मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन निघणाऱ्या इर्नटची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाठ लावणेकरीता सॅनिटरी लँडफिल्ड तयार करणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अंदाजे ४५० टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते. सदर कचऱ्यावर प्रक्रिया केल्यानंतर निघणाऱ्या इर्नटची "Sanitary Landfill" करुन विल्हेवाट लावणे कामी तांत्रिक सल्लागार म्हणुन मे. जयंत घिके यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

मे. जयंत घिके यांनी Sanitary Landfill तयार करण्यासाठी सादर केलेल्या नकाशे व डिझाईन "राष्टीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थान" (NEERI) यांच्याकडुन तपासणी करणे करीता पत्रव्यवहार करण्यात आला होता.

मे. जयंत घिके यांनी "Sanitary Landfill" तयार करण्यासाठी रु.१०,८५,९७,००६/- रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. दि.०५/०९/२०२२ रोजी मे. राष्टीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थान (NEERI) यांनी तांत्रिक सल्लागार मे. जयंत घिके यांनी सादर केलेले नकाशे व डिझाईन यांना प्राथमिक मंजुरी दिलेली आहे.

सन २०२२-२३ या आथिक वर्षात "इर्नट उचलणे/ कचरा सपाटीकरण/ लॅण्ड फिल्ड" या लेखाशिर्षकाअंतर्गत रु.४००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. याबाबत महानगरपालिकेने घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास सादर केला आहे. त्यात यापुर्वी Sanitary Landfill या घटकासाठी रु.२८०६५०५.८२/- लाख इतकी रक्कम मंजुर आहे. त्यासाठी ५ वर्ष असलेल्या शास्त्रोक्त भराव पध्दतीच्या कामासाठी रु.१०,८५,९७,००६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सविस्त्र प्रकल्प अहवालामध्ये बदल करुन शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामी रु.१०,८५,९७,००६/- होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता तसेच उपरोक्त कामाची निविदा मागविण्यासाठी प्रशासकिय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. २१ दिनांक २१।०९।२०२२**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन निघणाऱ्या इर्नटची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाठ लावणेकरीता सॅनिटरी लँडफिल्ड तयार करणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन निघणाऱ्या इर्नटची शास्त्रोक्त

पध्दतीने विल्हेवाट लावणेकरीता सॅनिटरी लँडफिल्ड तयार करणे रकमेच्या कामाच्या रु.१०,८५,९७,००६/- अंदाजपत्रकिय खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या सविस्तर अहवालामध्ये आवश्यक ते बदल करुन शासनास सादर करणे देखिल मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकल्पासाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नेमणुक करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास तसेच Sanitary Landfill ची निविदा प्रक्रिया करणेस आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## भांडार विभाग

**// गोषवारा //**

स्थगित दि. २९।०८।२०२२

**प्रकरण क्र.** 23 **:- आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणे कामाचे अवलोकन करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या नोटीस बोर्डवर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. प्रेमकिशन प्रिंटर्स यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकातील दरास मा.आयुक्त सो. दि.20/06/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणेकामी अंदाजित रु. 25,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येते आहे. तरी रु. 15,445/- इतक्या झालेल्या खर्चास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (भांडार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## भांडार विभाग

### प्रशासकीय ठराव दि.२९/०८/2022

**प्रकरण क्र.** २३ **:- आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणे कामाचे अवलोकन करणे.**

**ठराव क्र.** २२ **:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणे कामाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या 1 (अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा 2022 करिता माहिती पुस्तिका व पॉकेट डायरी छपाई करणे" याकामी दरपत्रकधारक मे. प्रेमकिशन प्रिंटर्स यांच्यामार्फत छपाई केलेल्या रु. 15,445/- च्या मर्यादेत खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## भांडार विभाग

### // गोषवारा //

सभा दि. 29/09/2022

**प्रकरण क्र. 24 :- दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे) खरेदी करणे कामाचे अवलोकन करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे) खरेदी करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या नोटीस बोर्डवर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. यमुना इंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकातील दरास मा.आयुक्त सो. दि.08/08/2022 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेस महानगरपालिकेत दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे) खरेदी करणेकामी अंदाजित रु. 84,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तरी रु. 83,040/- इतक्या झालेल्या खर्चास प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

15.9.22

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (भांडार)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## भांडार विभाग

### प्रशासकीय ठराव दि.२९/०८/2022

**प्रकरण क्र. २४ :- दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे) खरेदी करणे कामाचे अवलोकन करणे.**

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे) खरेदी करणे कामाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या 1 (अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "दि. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाकरिता खाऊ (चॉकलेट व बिस्किटे)" याकामी दरपत्रकधारक मे. यमुना इंटरप्रायजेस यांच्यामार्फत खरेदी केलेल्या रु. 83,040/- च्या मर्यादेत खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

// गोषवारा //

सभा दि० २१।९।२०२२

प्रकरण क्रमांक ( २५ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका मिरारोड (पुर्व) कनकिया आरक्षण क्र.269 या ठिकाणी कौस्तुभ राणे स्मारक विकसीत करण्याचे काम शासनाच्या विशेष निधीतुन मंजुर असून प्रगती पथावर आहे. सदर काम 80% पुर्ण झालेले आहे. सदर कामांचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर डिझाईन नुसार मशाल बसविणे आवश्यक आहे. परंतु स्मारकाच्या कामामध्ये मशाल तयार करणे काम अंदाजपत्रकात समाविष्ठ नाही. सदर काम करण्यासाठी मा.श्री.प्रताप सरनाईक, आमदार सतत पाठपुरावा करत आहेत. सदर कामाचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | अंदाजपत्रकीय खर्च |
|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे. | रु.36,58,000/- |

तरी सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने कामांच्या खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
प्र.शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा.आयुक्त यांच्या मान्येतेने.**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दिनांक 29/08/2022 रोजी दुपारी 1.30 वाजता.**

विषय क्र. (25) :- मा.आयुक्त महोदयाकडील कामकाज
मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मिरारोड (पुर्व) कनकिया आरक्षण क्र.269 या ठिकाणी कौस्तुभ राणे स्मारक विकसीत करण्याचे काम शासनाच्या विशेष निधीतुन मंजुर असून प्रगती पथावर आहे. सदर काम 80% पुर्ण झालेले आहे. सदर कामांचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर डिझाईन नुसार मशाल बसविणे आवश्यक आहे. परंतु स्मारकाच्या कामामध्ये मशाल तयार करणे काम अंदाजपत्रकात समाविष्ठ नाही. सदर काम करण्यासाठी मा.श्री.प्रताप सरनाईक, आमदार सतत पाठपुरावा करत आहेत. सदर कामी कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे कामाचे रु.36,58,000/- अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र. 24 दिनांक 29/08/2022</u>**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत : कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा-भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून कनकिया आरक्षण क्र.269 कौस्तुभ राणे स्मारक येथे मशाल तयार करणे कामाचे रु.36,58,000/- अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासकीय तथा आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## वैद्यकीय विभाग
## // गोषवारा //

सभा दि०२९।९।२०२२

**प्रकरण क्र. (२९) :- वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यात देणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभगाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके निविदा मागवून खरेदी करणेस मा. महासभा दि.२३/०६/२०२१, ठराव क्र. २० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. आयुक्त यांनी निविदा मागविणेस दि.०२/०८/२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. या अनुषंगाने दि.०५/०८/२०२१ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.२५/०८/२०२१ रोजी ई-टेंडरव्दारे २ वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांचे वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास मा. स्थायी सभेने यांनी दि.२९/०९/२०२१ रोजी ठराव क्र. ८६ ने मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीत डासनाशके व अळीनाशके संपत आलेली आहेत. त्याचप्रमाणे १२ मिनी टेम्पोवरील जेट स्प्रे मशिनव्दारे शहरात औषधफवारणीचे काम सुरु असून नविन २० भाडेत्वावरील मिनी टेम्पोंचा कार्यादेश दिलेला असून लवकरच त्यांचा पूरवठा होऊन एकूण ३२ मिनी टेम्पोवरील जेट स्प्रेव्दारे व औषध फवारणी कामगारांनमार्फत स्प्रेपंपाव्दारे औषध फवारणी केली जाणार आहे. सद्या पावसाळा सुरु असल्याने साथींच्या रोगांची शक्यता उदभवू शकते. सद्यस्थितीत डासनाशक व अळीनाशक औषधांचा साठा संपत आलेला आहे. त्यामुळे डास नियंत्रण कार्यक्रमात अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून डासनाशके व अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदर डासनाशके व अळीनाशके खरेदी करणेकामी रु. ४,९९,८५,५००/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "एकात्मिक डासनिर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षाखालील मंजूर रु. १०,००,००,०००/- या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरिल नमूद प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

15/9

(संजय शिंदे)
उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\HP\Downloads\Goshwara - डासनाशके व अळीनाशके.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दि.२१/०९/२०२२ रोजी दुपारी १.३० वाजता.**

विषय क्र. (२६) :- **मा. आयुक्त मोहदयाकडील कामकाज.**

**वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यात देणे.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभगाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके निविदा मागवून खरेदी करणेस मा. महासभा दि.२३/०६/२०२१, ठराव क्र. २० अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच मा. आयुक्त यांनी निविदा मागविणेस दि.०२/०८/२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. या अनुषंगाने दि.०५/०८/२०२१ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि.२५/०८/२०२१ रोजी ई-टेंडरव्दारे २ वर्षाकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांचे वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास मा. स्थायी सभेने यांनी दि.२९/०९/२०२१ रोजी ठराव क्र. ८६ ने मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीत डासनाशके व अळीनाशके संपत आलेली आहेत. त्याचप्रमाणे १२ मिनी टेम्पोवरील जेट स्प्रे मशिनव्दारे शहरात औषधफवारणीचे काम सुरु असून नविन २० भाडेत्वावरील मिनी टेम्पोंचा कार्यादेश दिलेला असून लवकरच त्यांचा पूरवठा होऊन एकूण ३२ मिनी टेम्पोवरील जेट स्प्रेव्दारे व औषध फवारणी कामगारांनमार्फत स्प्रेपंपाव्दारे औषध फवारणी केली जाणार आहे. सद्या पावसाळा सुरु असल्याने साथींच्या रोगांची शक्यता उदभवू शकते. सद्यस्थितीत डासनाशक व अळीनाशक औषधांचा साठा संपत आलेला आहे. त्यामुळे डास नियंत्रण कार्यक्रमात अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून डासनाशके व अळीनाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदर डासनाशके व अळीनाशके खरेदी करणेकामी रु. ४,९९,८५,५००/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "एकात्मिक डासनिर्मुलन योजना / ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षाखालील मंजूर रु. १०,००,००,०००/- या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येईल.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमूद प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. (२५) दि.२१/०९/२०२२**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभगाकरीता आवश्यक डासनाशके / अळीनाशके मंजूर दरानुसार खरेदी करणेस मान्यात देणेकामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन वैद्यकीय विभागाकरीता आवश्यक रु.४,९९,८५,५००/- इतक्या रक्कमेचे डासनाशके / अळीनाशके मंजूर दरानुसार खरेदी करणेस व कार्यादेश देणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यात देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागानी विहित पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\HP\Downloads\Goshwara - डासनाशके व अळीनाशके (1).docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

//गोषवारा//

सभा दि. 29/ 2/2022

विषय :- २८ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| सहायक अधिसेविका श्रेणी - 02 निमवैद्यकीय सेवा) | सरळसेवा/ नामनिर्देशन 50% | अ-1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (नर्सिंग) विषयाची पदवी.<br>अ-2) परिसेविका या पदावरील शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>अ-3) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>अ-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>किंवा<br>ब-1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>ब-2) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>ब-3) सिस्टर इन चार्ज/नाईट सुपरवायझर (परिसेविका) म्हणून शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधीत |

| | | |
|---|---|---|
| | | विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ब-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| | पदोन्नती 50% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत परिसेविका (सिस्टर इन चार्ज/नाईट सुपरवायझर) पदाचा किमान 05 वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (श्रेणी - 02, सार्वजनिक आरोग्य सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील स्वच्छता अधिकारी या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| उप-मुख्य उद्यान अधिक्षक (श्रेणी - 02, उदयान सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उद्यान अधीक्षक या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 01, अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| शाखा अभियंता (स्थापत्य) (श्रेणी - 02, अभियांत्रिकी सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| अग्निशमन केंद्र अधिकारी (श्रेणी - 02, अग्निशमन सेवा) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार सहायक अधिसेविका - 01 पद, उप-मुख्य स्वच्छता अधिकारी -02 पदे, उप-मुख्य उदयान अधिक्षक -02 पदे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) -

03 पदे, शाखा अभियंता (स्थपत्य) - 16 पदे व अग्निशमन केंद्र अधिकारी - 08 पदे ही पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.3 (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) , कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.22/12/2021, दि.09/02/2022, दि.09/03/2022 व दि.31/03/2022 रोजी आयोजित करण्यात आली होती.

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती

समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्रीम. स्वाती आ. राणे S-14 38600-122600 | परिसेविका | सहाय्यक अधिसेविका | खुला | S-15 41800-132300 |
| 2. | श्री.राजकुमार कांबळे S-14 38600-122800 | स्वच्छता अधिकारी | उप मुख्य स्वच्छता अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 3. | श्री.संदिप चंद्रकांत शिंदे S-14 38600-122800 | | | | |
| 4. | श्री. नागेश विरकर S-13 35400-112400 | उदयान अधिक्षक | उप मुख्य उदयान अधिक्षक | खुला | S-15 41800-132300 |
| 5. | श्री. हंसराज मेश्राम S-13 35400-112400 | | | | |
| 6. | श्री. किरण राठोड S-20 56100-177500 | उप-अभियंता (स्थापत्य) | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | खुला | S-23 67700-208700 |
| 7. | श्री. शरद नानेगांवकर S-20 56100-177500 | | | | |
| 8. | श्री.शिरीषकुमार पवार S-13 35400-112400 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | शाखा अभियंता (स्थापत्य) | खुला | S-15 41800-132300 |
| 9. | श्रीम.प्रांजल शैलेश कदम S-13 35400-112400 | | | | |
| 10. | श्री.सतिश जे.तांडेल S-13 35400-112400 | | | | |
| 11. | श्री.राजेंद्र बा.पांगळे S-13 35400-112400 | | | | |
| 12. | श्री.अरविंद ह. पाटील S-13 35400-112400 | | | | |
| 13. | श्री.भुपेश द.काकडे S-13 35400-112400 | | | | |
| 14. | श्री.उत्तम य. रणदिवे S-13 35400-112400 | | | | |
| 15. | श्री.उमेश अवचर (अपंग) S-13 35400-112400 | | | | |
| 16. | श्री.सचिन ना.पाटील S-13 35400-112400 | | | | |
| 17. | श्री.यतिन व. जाधव S-13 35400-112400 | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 18. | श्री.दिलीप रणवरे<br>S-13 35400-112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 19. | श्री.धनंजय वसंत कनोजे<br>S-13 35400-112400 | | | | |
| 20. | श्री.प्रकाश शंकर बोराडे<br>S-13 35400-112400 | | | | |

सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) गट-अ, शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

त्यामुळे सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) व अगिशमन केंद्र अधिकारी या पदावर दिलेल्या पदोन्नतीस तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार वर्ग-01 ची पदे पदोन्नतीने भरताना त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक असल्यामुळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ) व मा. विभागीय समितीने मान्यता दिल्यानुसार उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब) व अगिशमन केंद्र अधिकारी या पदास शासन मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर पदोन्नतीने नेमणूक करणेस मा.महासभेची मंजुरी मिळणेकरिता गोषवारा मा.महासभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

मा.महासभा दि.03/08/2022, ठराव क्र.28 अन्वये पदोन्नतीकरीता मा.महासभेची मंजुरी न घेता विविध अधिकाऱ्यांना परस्पर पदोन्नती दिलेली आहे ती नियमबाहय आहे. पदोन्नतीस मंजुरी देणेस संयुक्तीक ठरणार नाही तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अन्याय होवु नयें व पदोन्नतीस मंजुरी देताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) चे उल्लंघन झालेले आहे त्यामुळे सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील मा. महासभेत सादर करावा असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

मा.महासभा दि.03/08/2022 रोजीच्या पारीत झालेल्या ठराव क्र.28 मधील नमुद बाबी विचारात घेता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आणुन देण्यात येत आहे.

अधिकारी/कर्मचारी यांना महानगरपालिका आकृतीबंध, महानगरपालिका सेवा प्रवेश नियम, अधिकारी/कर्मचारी यांची सेवा जेष्ठता, पदोन्नती देण्यासंदर्भात शासनाचे शासन निर्णय/परिपत्रक, मा.न्यायालयाने पदोन्नती संदर्भात दिलेले निर्णय इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन नियमानुसार पात्र अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती दिलेली आहे. पदोन्नती देताना कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचेवर अन्याय झालेला नाही व दिलेली पदोन्नती नियमानुसार असल्यामुळे नियमांचे उल्लंघन झालेले नाही.

सबब वरील अधिकारी/कर्मचारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करुन मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेल्या पदोन्नत्या ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.महासभा मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मा.प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण सभा

## प्रशासकीय ठराव दि. २१ / ०९ /2022 रोजी दुपारी 03.30 वाजता

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार सहायक अधिसेविका (गट-ब), उप-मुख्य स्वच्छता अधिकारी (गट-ब), उप-मुख्य उदयान अधिक्षक (गट-ब), कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (गट-अ), शाखा अभियंता (स्थापत्य) (गट-ब) व अग्निशमन केंद्र अधिकारी (गट-ब) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|
| सहायक अधिसेविका<br>श्रेणी - 02<br>निमवैद्यकीय सेवा) | सरळसेवा/<br>नामनिर्देशन<br>50% | अ-1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. (नर्सिंग) विषयाची पदवी.<br>अ-2) परिसेविका या पदावरील शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>अ-3) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.<br>अ-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>किंवा<br>ब-1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>ब-2) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका.<br>ब-3) सिस्टर इन चार्ज/नाईट सुपरवायझर (परिसेविका) |

| | | |
|---|---|---|
| | | म्हणून शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधीत विषयातील किमान 05 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ब-4) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
